वर्ष- १२ | अंक- ४१ | मुंबई, मंगळवार,२५ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2 स्त्री स्वातंत्र्य, सेक्सवर्कर आणि हिंदू मुस्लीम ऐक्य : ह्याप्रभातह्नन 80 वर्षांपूर्वी सिनेमातून ह्याअसेह्न हाताळले हे विषय

3 → विदेशी निधीचा खेळ

वाहन हस्तांतरण व ना हरकत प्रमाणपत्रासाठी आधार प्रमाणीकरणाची सुधारित ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

एक्सपायर्ड तूप, शौचालय गोदामासमोर अन सिगारेट विक्री

ब्लिंकिटच्या 2 हबवर एफडीएची धडक कारवाई

मुंबई। ऑनलाईन अन्न साठवणूक आणि जलद वितरणासाठी प्रसिद्ध असलेल्या मेसर्स ब्लिंक कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेड (ब्लिंकिट) या नामांकित कंपनीला अन्न व औषध प्रशासनाने मोठा दणका दिला आहे. शहरातील सातारा परिसर हायकोर्ट कॉलनीबी आणि हरसूल परिसर येथील ब्लिंकिटच्या २ मुख्य केंद्रांचे अन्न परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहेत. एफडीएच्या तपासणीत अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि कायदेशीर नियमांचे अत्यंत गंभीर उल्लंघन झाल्याचे उघडकीस आल्याने ही धडक कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी अधिक माहिती अशी की, अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे, कीर्तिका झाडे आणि फरिद सिद्दीकी यांच्या पथकाने या दोन्ही ठिकाणी तपासणी केली. यावेळी थेट सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या त्रुटी आढळल्याने सहायक आयुक्त (अन्न) तथा परवाना प्राधिकारी द. वि. पाटील यांनी हे निलंबनाचे आदेश जारी केले.



अन्न व औषध प्रशासनाने दिलेल्या स्पष्ट आदेशानुसार, निलंबनाच्या कालावधीत ब्लिंकिट कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेडला किंवा त्यांच्या वतीने कोणालाही सातारा व हरसूल येथील केंद्रांतून कोणत्याही अन्नपदार्थांची खरेदी, साठवणूक किंवा भ्रमणध्वनी उपयोजनाद्वारे ऑनलाईन वितरण पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. या निलंबनानंतरही अनधिकृतपणे व्यवसाय किंवा वितरण सुरू ठेवल्यास अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कठोर कायदेशीर आणि गुन्हेगारी कारवाई केली जाईल, असा कडक इशारा प्रशासनाने दिला आहे.

ब्लिंकिटच्या गोदामांमध्ये आढळलेल्या मुख्य ६ गंभीर त्रुटी:

१) अन्नपदार्थांसोबत सिगारेट विक्रीः खाद्यपदार्थांच्या ऑनलाईन वितरण केंद्रावरूनच विल्स, क्लासिक, मार्लबोरो यांसारख्या तंबाखूजन्य सिगारेटची बेकायदेशीरपणे विक्री केली जात असल्याचे निष्पन्न झाले.

२) मुदत संपलेले (कालबाह्य) अन्न साठवणेः वापरण्याची मुदत संपलेल्या गाईच्या तुपाच्या प्लास्टिक बरण्या नियमित विक्रीच्या साठ्यामध्ये आढळल्या.

३) अस्वच्छता आणि शौचालयाची चुकीची जागाः हरसूल येथील गोदामात कांदा, बटाटा आणि पिठाचे कप्पे थेट शौचालयाच्या अगदी समोर ठेवलेले आढळले. हात धुण्याच्या ठिकाणी तंबाखूचे डाग आणि अस्वच्छता आढळल्याने सूक्ष्मजैविक दूषितीकरणाचा तीव्र धोका दिसून आला.

४) शीतसाखळीचे उल्लंघनः शीतगृहात ठेवणे अनिवार्य असलेले खाद्यपदार्थ सामान्य तापमानावर उघड्या कप्प्यांमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. तसेच शीतगृहांचे तापमान नोंदवणारे कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नव्हते.

५) शाकाहारी-मांसाहारी एकत्र अन कर्मचाऱ्यांची अस्वच्छताः शीतगृहात शाकाहारी व मांसाहारी पदार्थ एकाच कप्प्यात ठेवले होते. तसेच अन्न हाताळणारे कर्मचारी विशेष गणवेश, हातमोजे आणि डोक्यावरील टोपी न वापरता काम करत होते व त्यांच्याकडे वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्रे नव्हती.

६) पुरवठा साखळी व बिलांचा अभावः इतर आस्थापनांच्या नावाने खरेदी बिले आढळली, मात्र ब्लिंकिटशी त्यांचा असलेला अधिकृत संबंध व खरेदी-विक्रीची माहिती दर्शवणारी कागदपत्रे दाखवता आली नाहीत.

१० वर्षाच्या मुलीवर ५० वर्षीय काकाकडून अत्याचार...

पालघर। पालघरमध्ये १० वर्षाच्या मुलीवर तिच्या ५० वर्षीय काकाने लैंगिक अत्याचार धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी कुटुंबीयांनी तक्रार करुनही एफआयआर नोंदवण्यास पोलिसांकडून टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर आरोपही कुटुंबीयांनी केला आहे. पोलिसांकडून योग्य कारवाई होत नसल्याने पीडित मुलीच्या आई-वडिलांनी 'मुंबई प्रेस क्लब'मध्ये पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी पोलिसांच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त करत राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे तक्रार केली आहे. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, २१ जुलै रोजी रात्री सुमारे १०.२० वाजता हा प्रकार घडला. आरोपी मुलीचा काका आहे. तो सराफाचा व्यवसाय करत असून पीडितेच्या घराच्या वरच्या मजल्यावर राहतो. तळमजल्यावर कौटुंबिक वाद सुरू असताना त्याने मुलीवर अत्याचार केल्याचं कुटुंबीयांनी तक्रारीत म्हटलं आहे.

घटनेनंतर मुलीच्या वागण्यात मोठा बदल झाला. ती शाळेत जाण्यास टाळाटाळ करू लागली. घरात एकटी राहू लागली. तिला वारंवार ताप येत होता आणि भूकही कमी झाली होती. या सगळ्याचा परिणाम तिच्या अभ्यासावरही झाल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.

आईने विश्वासात घेऊन विचारणा करताच रडू कोसळलं

मुलीच्या वागण्यातला बदल पाहून तिच्या आईने ४ ऑगस्टला सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मुलीला रडू कोसळलं आणि तिने आपल्यासोबत घडलेला सर्व प्रकार आईला सांगितला. याबाबत समजताच संतप्त कुटुंबीयांनी थेट पालघर पोलिस ठाण्यात धाव घेतली. आरोपीविरोधात ढडउरड कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली. मात्र अधिकाऱ्यांनी एफआयआर नोंदवण्यात नकार दिला आणि ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क करून ऑनलाइन तक्रार नोंदवण्यास भाग पाडल्याचा आरोपही नातलगांनी केला आहे.

चौकशीत पोलिसांकडूनही त्रास? ४ ऑगस्ट रोजीच मुलीला स्थानिक ग्रामीण रुग्णालयात नेऊन वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर डॉक्टरांनी पोलिसांना देण्यासाठी वैद्यकीय मेमो दिला. ५ ऑगस्टला हा मेमो घेऊन कुटुंबीय पुन्हा पालघर पोलिस ठाण्यात गेले. त्यावेळी चौकशी दरम्यान पोलिसांनी मुलीला नाहक अनेक प्रश्नांची विचारणा केली, शिवाय या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यास मुलीच्या वडिलांना खोट्या गुन्ह्यात अडकवून तुरुंगात पाठवण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर आरोपही मुलीच्या आईने केला. पोलिसांकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने कुटुंबीयांनी अखेर महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकांकडे लेखी तक्रार केली. आरोपीविरोधात एफआयआर दाखल करावा, प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि निष्पक्ष तपासासाठी पालघर पोलिस ठाण्याबाहेर हे प्रकरण सोपवावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. पालघर एसपी म्हणाले, 'सखोल चौकशी करू'

चौकशी दरम्यान पोलिसांनी पीडित मुलीला नाहक अनेक प्रश्नांची विचारणा केली, शिवाय या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यास मुलीच्या वडिलांना खोट्या गुन्ह्यात अडकवून तुरुंगात पाठवण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर आरोपही मुलीच्या आईने केला.

या प्रकरणावर पालघरचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांनी सखोल चौकशी केली जाईल, असं सांगितलं आहे. तपासातून समोर येणाऱ्या तथ्यांच्या आधारे योग्य ती कारवाई केली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. आता या प्रकरणात पोलिसांकडून [illegible] कोणती कारवाई होते, याकडे लक्ष लागलं



15 वर्षाची मुलगी, लक्ष्मीपूजा अन अघोरी...

4 राज्यातून 15 लोक लातूरमध्ये जमले, ग्रामीण पोलिसांनी उधळून लावलाय

उत्तर प्रदेश। पैशाचा पाऊस पाडायचा, लक्ष्मीपूजा करायची आणि त्यासाठी चक्क एका अल्पवयीन मुलीचा वापर करायचा. अंधश्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेला हा धक्कादायक प्रकार उदगीर ग्रामीण पोलिसांनी उधळून लावलाय. पैशाचा पाऊस पाडण्याच्या नावाखाली नेमका कोणता विधी केला जाणार होता? अंधश्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या या धक्कादायक प्रकाराचा पर्दाफाश पोलिसांनी केलाय. 21 व्या शतकात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात पुरोगामी महाराष्ट्रात हे चाललंय तरी काय? पैशाचा पाऊस पाडता येतो, या अंधश्रद्धेतून लक्ष्मीपूजेच्या नावाखाली कथित विधीची तयारी आणि या विधीसाठी थेट एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलीचा वापर करण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार उदगीरमध्ये समोर आला आहे.

उदगीरपासून सुमारे 20 किलोमीटर अंतरावर करडखेल पाटीजवळ पहाटेच्या सुमारास हा प्रकार घडला. या अगोदरही लातूर जिल्ह्यातील अनेक भागात असे प्रकार घडले आहेत त्यामुळे या लोकांना कोणी अघोरी पूजा करण्यासाठी बोलावलं होतं याचा सुद्धा पोलिसांनी शोध घेतला पाहिजे अशी मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समिती राज्याचे अध्यक्ष माधव बावगे यांनी केली आहे. या प्रकरणात पोलिसांनी केलेल्या कारवाईही तितकीच धक्कादायक माहीती समोर येत आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पैशाचा पाऊस पाडण्यासाठी लक्ष्मीपूजेचा विधी करण्याच्या तयारीत असलेल्या 15 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय. यामध्ये महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि पुणे परिसरातील संशयितांचा समावेश आहे. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार ही कारवाई करण्यात आली असून, अल्पवयीन मुलीला या विधीसाठी नेमकं का आणण्यात आलं होतं, याचा तपास आता पोलीस करत आहेत पैशाचा पाऊस पाडण्याचं आमिष

लक्ष्मीपूजेच्या नावाखाली कथित विधी आणि त्यासाठी अल्पवयीन मुलीचा कथित वापर. उदगीरमधील या घटनेनं अंधश्रद्धेचं विदारक वास्तव पुन्हा समोर आणलंय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात आपण चंद्रावर पोहोचलो पण पैशांचा पाऊस पाडण्याच्या अंधविश्वासातून अजूनही बाहेर पडलो नाही, हेच या घटनेनं दाखवून दिलंय. आता या संपूर्ण प्रकारामागे नेमकं कोण? या विधीचा सूत्रधार कोण? आणि अल्पवयीन मुलीचा वापर का केला जाणार होता? या प्रश्नांची उत्तरं पोलिसांच्या तपासातून समोर येणं महत्त्वाचं आहे.

पुण्याच्या जुन्नरमध्ये नसरापूरची पुनरावृत्ती

उसाच्या शेतात नेऊन 10 वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करुन हत्या

पुणे। महाराष्ट्राला सून्न करणारी घटना जुन्नरमध्ये उघडकीस आली आहे. नसरापूरच्या निर्भयाला न्याय मिळाल्यानंतर कुठेतरी महिला अत्याचारांच्या घटनांना आळा बसेल अशी आशा असतानाच जुन्नरमध्ये हादरवणारी बातमी समोर आली आहे. जुन्नरमध्ये नसरापूरच्या घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे साडेनऊ वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेजारीच राहणाऱ्या एका तरुणाने साडेनऊ वर्षाच्या अल्पवयीन मुलीच्या ओळखीचा गैरफायदा घेत तिला गावातून बाहेर नेले. त्यानंतर उसाच्या शेताजवळ तिच्यावर पाशवी लैंगिक अत्याचार करून तिचा गळा दाबून खून केला.



बराच वेळ झाला तरी मुलगी सापडत नाही म्हटल्यावर तिच्या घरच्यांनी शोधाशोध सुरू केली. अखेर शोध घेऊनही मुलगी सापडत नाही म्हटल्यावर तिच्या पालकांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार कुटुंबीयांनी दिल्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही आणि स्थानिक माहितीच्या आधारे अवघ्या काही तासांत संशयित आरोपीला ताब्यात घेतलंय.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी फॉरेन्सिक पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून पंचनाम्याचे काम पूर्ण केले आहे. या घटनेमुळे पिंपळवंडी परिसरात प्रचंड संतापाचे वातावरण असून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत. पुणे। पुण्यातील जुन्नर तालुक्यात एका दहा वर्षाच्या चिमुकडीवर लैंगिक अत्याचार करुन तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेने परिसरात संपात व्यक्त करण्यात येत आहे. जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी ही घटना समोर आली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मात्र जेव्हा घटना उघडकीस आली तेव्हा आरोपीच पोलिसांना मदत करण्याच्या बहाण्याने सोबत फिरत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने चिमुकलीला सायकल शिकवण्याच्या बहाण्याने घरातून घेऊन गेला. त्यानंतर तो तिला घेऊन शेतातील निर्जन नाल्याकाठी घेऊन गेला. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केले आणि त्यानंतर तिची निर्घृण हत्या केली. साहिल उर्फ पांग्या खैरे असं आरोपीचे नाव असून त्याचे वय फक्त 25 वर्ष इतके आहे. धक्कादायक म्हणजे, हे घृणास्पद कृत्य केल्यानंतर 25 वर्षीय नराधम आरोपी साहिल उर्फ पांग्या खैरे गावात उजळ माथ्याने फिरत होता. एवढंच नव्हे तर पोलिसांना तपासात मदत करण्याचा आव आणत होता. तो पोलिसांसोबत सीसीटिव्ही फुटेज पाहत होता. मात्र, पोलिसांना संशय येताच खाक्या दाखवताच या नराधमाने आपला गुन्हा कबूल केला आहे. या अमानुष घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत 15 दिवसांच्या आत चार्जशीट दाखल करण्यात येणार आहे. जलद गतीने या प्रकरणाचा तपास करण्यात येणार आहे. तसंच, आरोपी हा शेतमजुरी करणारा असून या घटनेत एकच आरोपी आहे. आरोपीला गावातून अटक करण्यात आली आहे. आरोपी चिमुकलीला मारहाण देखील केली आहे. तसंच, पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

आध्यात्मिक गुरूने मागितले तरूणीचे फोटो

पुणे। शरिरातील नकारात्मक उर्जा घालवण्याची बतावणी करीत तथाकथित अध्यात्मिक गुरूने तरूणीला भीती दाखवून तिचे अर्धनग्न फोटो मागवून विनयभंग केल्याची धक्कादायक घटना कोंढव्यात घडली आहे. पोलिसांनी या गुरुला अटक केली आहे. याप्रकरणी दिव्य जितेंद्र परमार असे आरोपीचे नाव आहे. त्याचे वय 23 वर्ष असून तो पार्श्वनगर सोसायटी, कोंढवा बुद्रुक येथे राहतो. या अध्यात्मिक गुरूविरूद्ध विनयभंगासह जादूटोणा प्रतिबंध कायदा २०१३ चे कलम ३(२)कायद्यानुसार कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्याला अटक केली असून, पोलिसांनी मोबाईल, लॅपटॉप जप्त केला आहे. याप्रकरणी 22 वर्षीय तरूणीने फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दिव्य परमार हा कोंढव्यात राहायला असून, महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्याने प्रेरणादायी वक्ता असल्याचा स्वतः प्रचार केला. त्यानंतर त्याने सोशल मीडियावर युट्यूब चॅनेल सुरू केले. त्याद्वारे सेमीनार घेउन त्याने स्वतःला बाबा म्हणवून घेण्यास सुरूवात केली. दरम्यान, प्रेरणादायी भाषण देत असताना त्याने महिलांसह मुलींना व्यायामाच्या टिप्स दिल्या. त्यानंतर संबंधित तक्रारदार तरुणी आरोपी परमार च्या संपर्कात आली. त्यावेळेस त्याने तिला फिजिकल ॲक्टिव्हिटीच्या नावाखाली तुज्या शरीरामध्ये निगेटिव्ह एनर्जी गेली आहे, ती काढण्यासाठी तुझे अर्धनग्न फोटो पाठव अशी मागणी केली. तक्रारदार तरूणीला भीती दाखवून आरोपी परमारने तिचे अर्धनग्न फोटो मोबाईलद्वारे मागून घेतले. याप्रकरणी तरूणीने नुकतीच कोंढवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यापार्श्वभूमीवर पोलिसांनी आरोपीविरूद्ध (विनयभंग) तसेच जादूटोणा प्रतिबंध कायदा २०१३ चे कलम ३(२)कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोक्सो कायद्यातील कलमांतर्गत गुन्हा या प्रकरणात महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यातील कलम 3 (3) तसेच पॉक्सो कायद्यातील कलम 12 आणि 18 अन्वये गुन्हा दाखल आहे. अटक केलेल्या आरोपीसह इतर संशयितांची चौकशी सुरू आहे .या अघोरी विधीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा तपास पोलीस करत आहेत. तपासादरम्यान आणखी काही अटक होण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. सदरील तांत्रिक हा व्यवसायाने नाभिक आहे. त्याने या सर्व लोकांशी संपर्क कसा केला होता? त्या संपर्कात सर्वप्रथम कोण आलं? या विधी करण्यामागे कोणती आघोरी कृती होती? या सर्व बाबींचा तपास आम्ही करत असल्याची माहिती उदगीरचे पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे यांनी दिली आहे.



पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,२५ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६

स्त्री स्वातंत्र्य, सेक्सवर्कर आणि हिंदू मुस्लीम ऐक्य : 'प्रभात'नं ८० वर्षांपूर्वी सिनेमातून 'असे' हाताळले हे विषय



माणूस आणि शेजारीः स्वातंत्र्यपूर्व काळातील दोन चित्रपट, पण आजही न संपलेले प्रश्न भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात पुणे येथील 'प्रभात फिल्म कंपनी' आणि तिचे प्रमुख दिग्दर्शक व्ही. शांताराम यांचं ठळकपणे वेगळं स्थान आहे. 1930 च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि 1940च्या दशकाच्या सुरुवातीला शांताराम यांनी सलगपणे तीन सामाजिक चित्रपट दिले, जे आजही प्रभातच्या सर्वोत्तम कामगिरीचे प्रतीक मानले जातात. 'कुंकू' (हिंदीत 'दुनिया न माने', 1937), 'माणूस' (हिंदीत 'आदमी', 1939) आणि 'शेजारी' (हिंदीत 'पडोसी', 1941) अशी या चित्रपटांची नावं. या तिन्ही चित्रपटांत त्या काळातील भारतीय समाजाला अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांना शांताराम यांनी थेट हात घातला. 'कुंकू'मध्ये जरठ विवाह आणि स्त्रीचं स्वातंत्र्य, 'माणूस'मध्ये वेश्याव्यवसाय आणि शरीरस्वायत्तता, तर 'शेजारी'मध्ये हिंदू-मुस्लीम ऐक्य. यातील शेवटचे दोन चित्रपट आज, जवळपास ऐंशी ते पंच्याऐंशी वर्षांनंतर, पुन्हा पाहिले तर एक विचित्र, अस्वस्थ करणारी जाणीव होते.

त्याचं कारण म्हणजे, या सिनेमांमधील प्रश्न अजूनही जुने झालेले नाहीत. ते आजही तितकेच जिवंत, तितकेच धगधगते आहेत.

'माणूस': शरीरावरील हक्क आणि समाजाची नैतिकता

'माणूस' ही एका प्रामाणिक पोलीस हवालदाराची आणि एका वेश्येची कथा आहे. गणपत (शाहू मोडक) हा कर्तव्यदक्ष पोलीस आपल्या रोजच्या गस्तीदरम्यान वेश्यागृहांवर पडलेल्या धाडीच्या वेळी मैनाला (शांता हुबळीकर) वाचवतो. ही पहिली भेटच चित्रपटाच्या संपूर्ण नैतिक रचनेचा पाया रचते.

एक कायद्याचा रक्षक आणि त्याच कायद्याने 'गुन्हेगार' ठरवलेली स्त्री, अशा दोन व्यक्तींमधलं हे नातं आहे. (शांतारामांच्या 'पिंजरा'मध्येही अशीच नैतिक रचना आहे. एक आदर्श शिक्षक आणि तमाशात काम करणारी एक बाई.)

चित्रपटाची सुरुवातच विलक्षण आहे. कॅमेरा एका वेश्यागृहाच्या उंबरठ्यावरून, जुगार खेळणाऱ्या माणसांच्या पायांचा माग घेत आत शिरतो. हा शॉट इतका आधुनिक, इतका सिनेमॅटिक आहे की, तीसच्या दशकातील भारतीय चित्रपटाच्या दृश्यभाषेची समृद्धता अनपेक्षितपणे मनावर ठसते.

धाडीच्या प्रसंगातील तिरकस कोन, गडद सावल्या आणि गणपतच्या टॉर्चच्या प्रकाशात पहिल्यांदा दिसणारा मैनाचा चेहरा, हे सगळे शांताराम यांच्या दृश्यकल्पनेची साक्ष देतात.

गणपत मैनाच्या प्रेमात पडतो आणि तिला या व्यवसायातून बाहेर काढून तिच्याशी लग्न करण्याचा निर्धार करतो. इथेच चित्रपटाचा खरा संघर्ष सुरू होतो, आणि तो संघर्ष बाह्य नसून अंतर्गत आहे.

मैनाचं गणपतवर प्रेम आहे, त्याच्यासोबतच्या आयुष्याची, एका 'सामान्य' स्त्रीसारखे जगण्याची ओढही आहे.

मात्र, तिचा स्वतःबद्दलचा अपराधभाव, तिच्या भूतकाळाची लाज आणि समाज आपल्याला कधीच स्वीकारणार नाही ही खोलवर रुजलेली भावना तिला सतत मागे खेचत राहते.

'माणूस'च्या मध्यभागी एक प्रसंग येतो, जो बाकी चित्रपटाच्या गंभीर सुरापासून पूर्ण वेगळा वाटतो आणि नेमक्या याच वेगळेपणामुळे तो लक्षात राहतो. गणपत आणि मैना फिरता फिरता चुकून एका फिल्म स्टुडिओच्या सेटवर जाऊन पोचतात आणि तिथे सुरू असलेलं शूटिंग बघत राहतात.

समोर दिसतं ते त्या काळातल्या बॉम्बे टॉकीज-छाप रोमँटिक सिनेमाचं विडंबन. झाडाखाली बसलेला परदेशी थाटाचा नायक-नायिका जोडा एकमेकांशी गोड गोड बोलतो आणि थेट पडद्यावरच लाईव्ह ऑर्केस्ट्रासोबत गाणं म्हणू लागतो. शांताराम इथे स्वतःच्याच माध्यमाकडे बोट दाखवतात.

विविध अभ्यासकांनी प्रभात स्टुडिओच्या आणि शांताराम यांच्या या कालखंडातील चित्रपटांकडे पाहताना नेहमी हे अधोरेखित केले आहे की, हे चित्रपट केवळ करमणूक नव्हते, तर ते एका विशिष्ट सामाजिक भूमिकेतून, समाजसुधारणेच्या प्रामाणिक तळमळीतून तयार झालेले होते. फोटो स्रोत,टअठडडर/रउफएएठऋऋअइ

फोटो कॅप्शन,विविध अभ्यासकांनी प्रभात स्टुडिओच्या आणि शांताराम यांच्या या कालखंडातील चित्रपटांकडे पाहताना नेहमी हे अधोरेखित केले आहे की, हे चित्रपट केवळ करमणूक नव्हते, तर ते एका विशिष्ट सामाजिक भूमिकेतून, समाजसुधारणेच्या प्रामाणिक तळमळीतून तयार झालेले होते.

एका बाजूला एक कृत्रिम, टापटीप रोमान्स आहे, ज्यात प्रेम एका सुंदर पॅकेजमध्ये गुंडाळून दिलं जातं. दुसरया बाजूला गणपत आणि मैनाचं प्रेम आहे, जे वेश्यागृहाच्या उंबरठ्यावर, समाजाच्या तिरस्काराच्या सावलीत उमलतं आणि ज्याला कुठलंच गोड गाणं सुसह्य बनवत नाही.

हा एक छोटासा, विनोदी वाटणारा प्रसंग असला तरी त्यातून शांताराम स्वतःच्या चित्रपटाची भूमिका स्पष्ट करतात, ती म्हणजे आपण जे मांडतो आहोत ते त्या काळातल्या ग्लॅमरस, शहरी सिनेमापेक्षा वेगळं आहे आणि मुद्दामून वेगळं आहे. या एका दृश्यातून 'माणूस' आत्मभानी होतो. तो नुसतीच एक गोष्ट सांगत नाही, तर त्याच वेळी कुठली गोष्ट सांगायची 'नाही' हेदेखील ठरवतो.

चित्रपटातील एक प्रसंग हे आंतरिक द्वंद्व अत्यंत सूक्ष्मपणे पडद्यावर आणतो. गणपतची सालस, धार्मिक आई (सुंदराबाई) आणि मैना देवघरात शेजारी झोपलेल्या असतात. आई शांतपणे झोपलेली आहे, तर मैना अस्वस्थ, तळमळणारी.

तिचा हात चुकून आईच्या पूजेतील तानपुऱ्याला लागतो आणि त्यातून एक स्वर उमटतो. या एका साध्या आवाजासोबत मैनाचा चेहरा, देव्हाऱ्यातील देवता, पूजेचे पुस्तक, मिणमिणता दिवा अशा शॉट्सची एक जलद माळ गुंफली जाते.

कुठलाही संवाद न वापरता, केवळ प्रतिमा आणि संकलनाच्या साहाय्यानं मैनाच्या मनातील कोलाहल इथे उभा राहतो. आपण आईसारखे, गणपतच्या जगातील स्त्रीसारखे कधीच होऊ शकणार नाही, ही जाणीव या एका दृश्यात संपूर्णपणे साकार होते.

चित्रपटाचा शेवट हा त्या काळासाठीही धक्कादायक आणि आजही विचार करायला लावणारा आहे. मैनाला तिच्या दुष्ट काकाच्या खुनाच्या आरोपाखाली अटक होते. गणपत तिला तुरुंगातून सोडवण्याची, तिला नवे आयुष्य देण्याची तयारी दाखवतो.

मात्र मैना हा प्रस्ताव नाकारते. ती स्वतःहून मागे राहणे पसंत करते, कारण आपला भूतकाळ आपल्याला कधीच सोडणार नाही, आपण गणपतच्या सन्मान्य जगात कधीच मिसळू शकणार नाही, अशी तिची खात्री असते.

हा शेवट चित्रपटाला त्या काळातील समाजसुधारणावादी चित्रपटांच्या ठरलेल्या साच्यापासून वेगळा ठरवतो, पण त्याचवेळी एक गंभीर प्रश्नही उभा करतो. याआधी अनेक



समीक्षकांनी नोंदवल्याप्रमाणे, हा शेवट मुळातच क्रांतिकारी नाही; तो 'वेश्या ती वेश्याच' अशा स्वरूपाच्या जुनाट समजुतीला छेद न देता तिथेच थांबतो.

मैनाला स्वतःच्या आयुष्याची निवड करण्याची संधी चित्रपट देतो खरा, पण ती निवड शेवटी तिला पुन्हा त्याच समाजव्यवस्थेच्या अखत्यारीत नेऊन सोडते जी तिला कधीच स्वीकारत नाही. इथेच 'माणूस'चे आजच्या काळाशी असलेले अस्वस्थ करणारे साम्य समोर येते. सेक्स वर्कर्सचं पुनर्वसन, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे, त्यांच्या निवडीचा आणि त्यांच्या शरीरावरील हक्काचा आदर करणे, हे प्रश्न आजही भारतीय समाजात आणि कायदेव्यवस्थेत अनुत्तरित आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने अलीकडच्या वर्षांत लैंगिक कामगारांना सन्मानाने जगण्याचा हक्क आहे असे ठामपणे नमूद केले असले, तरी समाजाची मानसिकता बदलणे ही वेगळी आणि अधिक कठीण गोष्ट आहे. मैनाला जो प्रश्न पडतो, तो आजही असंख्य स्त्रियांना पडतोः माझा भूतकाळ मला कायमचा बांधून ठेवणार का? माज्या निवडीचे, माज्या नात्यांचे, माज्या आयुष्याचे मालक मीच असू शकते का, की समाजाने माज्यावर लादलेली ओळखच (आयडेंटिटी) माझे भविष्य ठरवणार? 'माणूस' हा प्रश्न उत्तर न देता तसाच ठेवतो आणि कदाचित त्यामुळेच तो आजही प्रस्तुत वाटतो; कारण या साऱ्या प्रश्नांचे उत्तर अजूनही सापडलेले नाही. या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शांताराम यांनी घेतलेली प्रचंड मेहनत. वेश्यागृहाचे, तिथल्या वातावरणाचे अचूक चित्रण व्हावे म्हणून त्यांनी स्वतः मुंबईतील रेड लाईट भागांना भेटी दिल्या आणि निरीक्षणे नोंदवली.

ही सगळी निरीक्षणे कलादिग्दर्शक एस. फत्तेलाल यांनी स्टुडिओतच पुनर्निर्मिली. आजही यातले अनेक सेट्स प्रत्यक्ष जागेवर चित्रित केल्यासारखे वास्तव वाटतात. हे वास्तववादी चित्रण हादेखील या चित्रपटाचा आत्मा आहे.

मैना ही नुसती एक प्रतीक नसून ती चुकीच्या परिस्थितीत अडकलेली, प्रेमासाठी आसुसलेली, पण समाजाच्या नैतिकतेच्या जोखडाखाली दबलेली एक माणूस आहे.

'शेजारी': दोन मित्र, एक धरण आणि फूट पाडणारे राजकारण

'शेजारी' ही शांताराम यांची प्रभातमधील शेवटची आणि कदाचित सर्वात ठळक राजकीय भाष्य करणारी कलाकृती. या चित्रपटाची कथा अगदी साधी, पण तितकीच प्रतीकात्मक आहे.

एका खेड्यात जिवबा पाटील (केशवराव दाते) हा हिंदू आणि मिर्झा (गजानन जागिरदार) हा मुस्लीम, हे दोघे आयुष्यभराचे जिवलग मित्र आणि गावातील वडीलधारे गृहस्थ आहेत. दोघांची कुटुंबे एकमेकांच्या इतकी जवळ आहेत की त्यांच्यातला फरकच कुणाला जाणवत नाही. ते एकत्र बुद्धिबळ खेळतात, एकत्र प्रार्थना करतात, एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. इतकेच नव्हे, तर त्यांची नातवंडेदेखील त्याच आपुलकीने एकमेकांसोबत वाढतात.

त्यांची बुद्धिबळाची आवड पुढच्या पिढीतही उतरलेली दिसते. ही मैत्री केवळ दोन व्यक्तींपुरती मर्यादित न राहता दोन पिढ्यांमधून, दोन कुटुंबांमधून संक्रमित होणारी एक परंपरा बनली आहे.

या निवांत, सलोख्याच्या गावजीवनात ओंकार (मानाजीराव) नावाचा एक शहरी उद्योगपती प्रवेश करतो. त्याला या गावाजवळ धरण बांधायचे असते. सुरुवातीला गावकरी, जिवबा आणि मिर्झा यांच्यासह, या धरण प्रकल्पाला एकत्रितपणे विरोध करतात; कारण हे धरण त्यांची जमीन, त्यांचे गाव, त्यांचे अस्तित्त्वच गिळंकृत करणार असते.

पण ओंकारला हे माहीत असते की एकसंध गावाला हरवणे अशक्य आहे. त्यामुळे तो वेगळी रणनीती अवलंबतोः गावात फूट पाडण्याची, हिंदू आणि मुस्लीम समाजात अविश्वास निर्माण करण्याची रणनीती.

एका घराला आग लागते. ही आग जिवबा आणि त्याचा मुलगा रायबाने मुद्दाम लावली आहे असे मिझार्ला पटवून दिले जाते. या एका अफवेने, या एका खोट्या संशयाने वर्षानुवर्षांची मैत्री ढासळू लागते.

गावकऱ्यांच्या दबावाखाली मिर्झा अखेर जिवबाच्या कुटुंबाला वाळीत टाकतो. इतक्या वर्षांची आपुलकी, इतक्या पिढ्यांची नाती



एका कारस्थानामुळे कोलमडून पडतात आणि नेमका याच फुटीचा फायदा घेत धरणाचे काम पुढे रेटले जाते.

या चित्रपटाची निर्मितीच एका विचारपूर्वक राजकीय भूमिकेतून झाली होती. हा चित्रपट तयार होत असताना मुस्लीम लीगची स्थापना झालेली होती आणि हिंदू-मुस्लीम तणाव शिगेला पोचलेला होता. अशा परिस्थितीत शांताराम यांनी जाणीवपूर्वक एक प्रतिकात्मक निवड केली. आपली ओळख वरवरची आहे, आतून आपण सारखेच आहोत, हा संदेश पडद्यामागूनच चित्रपट देत होता. शांताराम यांनी ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या धोरणावर थेट टीका करण्याचे धाडसही या चित्रपटातून दाखवले. ओंकार हा उद्योगपती गावात फूट पाडतो, हे रूपक त्या काळातील प्रेक्षकांना वसाहतवादी सत्तेच्या डावपेचांची आठवण करून देणारे होते.

चित्रपटातील 'लख लख चांदेरी तेजाची न्यारी दुनिया' हे दहा मिनिटांचे मशाल नृत्य गाणे त्या काळी अतिशय गाजले. हे गाणे गावातील एकोप्याच्या, उत्सवी क्षणांचे प्रतिनिधित्व करते.

मशालींच्या प्रकाशात एकत्र नाचणारे, गाणारे गावकरी, ज्यांच्यात धर्माचा कुठलाही भेद दिसत नाही. हे दृश्य चित्रपटाच्या उत्तरार्धात येणाऱ्या फुटीच्या, अविश्वासाच्या प्रसंगांशी थेट विरोधाभास निर्माण करते.

एका बाजूला एकत्र पेटलेल्या मशालींचा प्रकाश, तर दुसऱ्या बाजूला त्याच गावाला जाळणारी संशयाची आग हा दृश्य-विरोधाभास चित्रपटाचा गाभा आहे.

दोन्ही चित्रपटांमध्ये दिग्दर्शक व्ही. शांताराम यांची सहानुभूती त्या लादलेल्या ओळखीविरुद्ध लढणाऱ्या माणसांसोबत आहे. चित्रपटाचा शेवट अत्यंत प्रतिकात्मक आणि शोकात्म आहे. धरण बांधून पूर्ण होते, पण अखेर तेच धरण फुटते. या आपत्तीच्या क्षणी, इतकी वर्षे वेगळे झालेले पाटील आणि मिर्झा एकमेकांना मदत करण्यासाठी पुन्हा एकत्र येतात आणि पाण्याच्या रेट्यात एकमेकांचे हात धरून मृत्युमुखी पडतात.

हा शेवट कुठल्याही सहज सुखांत समाधानाचा भाग नाही. इथे दोघांचेही जीव जातात, पण ते एकत्र, हातात हात घालून जातात. ही प्रतिमा चित्रपटाचा संपूर्ण युक्तिवाद एका क्षणात मांडतेः धर्म ही माणसांना खऱ्या अर्थाने जोडणारी गोष्ट नाही.

शतकानुशतकांची सहजीविता, एकमेकांवरचा विश्वास आणि संकटाच्या क्षणी एकमेकांसाठी उभे राहण्याची तयारी माणसांचं माणूसपण टिकवून आहे. हे नाते कृत्रिमरीत्या निर्माण केलेल्या फुटीपेक्षा अधिक टिकाऊ, अधिक खरे आहे, असे चित्रपट ठामपणे सांगतो.

आज, स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही 'शेजारी'मधील हा युक्तिवाद विचलित करणाऱ्या पद्धतीने प्रस्तुत वाटतो. धार्मिक तेढ निर्माण करणे, समाजात फूट पाडून त्याचा राजकीय किंवा आर्थिक फायदा उचलणे, ही प्रवृत्ती आज ब्रिटिश वसाहतवाद्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. उलट, ती आपल्याच समाजातील अनेक शक्तींकडून सातत्याने वापरली जाताना दिसते. समाज माध्यमांवर पसरणाऱ्या अफवा, धार्मिक मुद्द्यांवरून होणारे राजकीय ध्रुवीकरण, शेजाऱ्या-शेजाऱ्यांमध्ये निर्माण होणारा अविश्वास हे सगळे 'शेजारी'मधील ओंकारच्या डावपेचांचीच आधुनिक आवृत्ती वाटावी इतके साम्य यांत आहे.

एका छोट्या अफवेने वर्षानुवर्षांचा सलोखा कसा उद्ध्वस्त होऊ शकतो, हे शांताराम यांनी ऐंशी वर्षांपूर्वी जे दाखवले, ते आजही तितकेच खरे आहे, किंबहुना आजच्या काळात अधिक वेगाने आणि अधिक व्यापक प्रमाणावर घडताना दिसते.

दृश्य चमत्कृतींमधील कारागिरी

तंत्रज्ञानाच्या फारशा सोयी नसलेल्या त्या काळात शांताराम आणि प्रभातच्या चमूने जे साधलं, ते आजही अचंबा वाटावा असं आहे. संगणकीय दृश्यपरिणामांचा (व्हीएफएक्स) मागमूसही नसलेल्या 1941 साली धरण फुटण्याचा प्रसंग मॉडेल्स आणि प्रत्यक्ष सेटवरील बांधणी यांच्या मिश्रणातून इतक्या ताकदीने उभा राहतो की तो आजही खोटा वाटत नाही.

या दृश्याची योजना इतकी बारकाईने केलेली आहे की जलप्रवाहाचा रेटा, कोसळणारे बांधकाम आणि गावकऱ्यांची पळापळ एकाच लयीत गुंफलेली आहे. कुठेही संकलनाचा किंवा गतीचा अडथळा जाणवत नाही.

याखेरीज चित्रपटात एक कल्पनारम्य प्रसंगही येतो, ज्यात एका प्रेमीयुगुलाची पाण्यातील प्रतिबिंबं स्वतंत्रपणे हलू लागतात. कॅमेरा या उलट्या प्रतिबिंबांमध्ये झुकत जातो, गोल फिरतो आणि पुन्हा वर येतो तेव्हा आपण एका वेगळ्याच, स्वप्नवत जगात पोचलेलो असतो. 'माणूस' आणि 'शेजारी' या दोन्ही चित्रपटांच्या गाभ्यात एक समान सूत्र आहेः व्यक्ती किंवा समाज यांच्यावर बाहेरून लादल्या जाणाऱ्या ओळखी आणि निर्णयांविरुद्धचा संघर्ष.

हा सगळा खेळ केवळ कॅमेऱ्याची हालचाल, आरसा किंवा पाण्याचा पृष्ठभाग आणि संकलन यांच्याच जोरावर उभा राहतो, तेही अर्थातच कुठल्याही आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीशिवाय. मूकपटांच्या काळातली दृश्यकल्पक प्रयोगशीलता या दोन्ही प्रसंगांत जिवंत असल्याचं जाणवतं.

'माणूस'मध्येही भपकेबाज परिणामांऐवजी



सावल्या, कॅमेऱ्याचे तिरके कोन आणि प्रकाशयोजना यांतूनच नाट्य उभं राहतं. या दोन्ही चित्रपटांतली प्रत्येक दृश्य-युक्ती कथेच्या भावनिक गाभ्याला बळकटी देण्यासाठीच वापरलेली दिसते.

दोन चित्रपट, एक समान धागा

'माणूस' आणि 'शेजारी' हे दोन्ही चित्रपट वरवर पाहता पूर्णपणे वेगळ्या विषयांवर बेतलेले वाटतात. एकात वैयक्तिक प्रेमकथा आणि सामाजिक नैतिकतेचा संघर्ष आहे, तर दुसरा सामूहिक सलोखा आणि राजकीय कारस्थानाची कहाणी सांगतो.

पण या दोन्ही चित्रपटांच्या गाभ्यात एक समान सूत्र आहेः व्यक्ती किंवा समाज यांच्यावर



बाहेरून लादल्या जाणाऱ्या ओळखी आणि निर्णयांविरुद्धचा संघर्ष. मैनाला समाज एक कायमची 'वेश्या' म्हणून बघतो. त्यामुळेच तिची स्वतःची निवड, तिचे स्वतःचे प्रेम, स्वशरीरावरील हक्क यांना त्या ओळखीसमोर जागा उरत नाही. पाटील आणि मिर्झा यांना त्यांच्या धर्माच्या आधारावर एकमेकांचे शत्रू बनवले जाते, त्यांची वर्षानुवर्षांची व्यक्तिगत मैत्री त्या 'लादलेल्या' सामूहिक ओळखीसमोर तकलादू ठरवली जाते. दोन्ही चित्रपटांत समाज किंवा बाह्य शक्ती व्यक्तीच्या किंवा नात्याच्या खऱ्या स्वरूपापेक्षा अधिक शक्तिशाली ठरतात. मात्र दोन्हीकडे दिग्दर्शक व्ही. शांताराम यांची सहानुभूती त्या लादलेल्या ओळखीविरुद्ध लढणाऱ्या माणसांसोबत आहे.

'माणूस' आणि 'शेजारी' हे दोन्ही चित्रपट वरवर पाहता पूर्णपणे वेगळ्या विषयांवर बेतलेले वाटतात.फोटो स्रोत,टअठडडर/रउफएएठऋऋअइ

फोटो कॅप्शन,'माणूस' आणि 'शेजारी' हे दोन्ही चित्रपट वरवर पाहता पूर्णपणे वेगळ्या विषयांवर बेतलेले वाटतात.

विविध अभ्यासकांनी प्रभात स्टुडिओच्या आणि शांताराम यांच्या या कालखंडातील चित्रपटांकडे पाहताना नेहमी हे अधोरेखित केले आहे की, हे चित्रपट केवळ करमणूक नव्हते, तर ते एका विशिष्ट सामाजिक भूमिकेतून, समाजसुधारणेच्या प्रामाणिक तळमळीतून तयार झालेले होते.

ब्रिटिश सेन्सॉरशिपच्या मर्यादांमध्ये राहूनही शांताराम यांनी जे प्रश्न उपस्थित केले, ते त्या काळातील भारतीय समाजाला अस्वस्थ करणारे, त्याला आरसा दाखवणारे होते.

आज पाहताना या चित्रपटांतील नाट्यमयता, त्यांचा उपदेशात्मक सूर थोडा जुना वाटू शकतो; पण त्यांनी हाताळलेले मूळ प्रश्न आजही जिवंत आहेत हे नाकारता येत नाही.

'माणूस'मधील मैना आणि 'शेजारी'मधील पाटील-मिर्झा यांची कहाणी ही शेवटी मूलभूत मुद्द्यांभोवती फिरते. माणसाला स्वतःच्या ओळखीची, स्वतःच्या निवडीची, स्वतःच्या नात्यांची मालकी किती असते आणि समाज, राजकारण किंवा बाह्य सत्ता त्या मालकीवर किती अतिक्रमण करू शकतात?

स्वातंत्र्यपूर्व काळातील एका स्टुडिओने, मर्यादित तंत्रज्ञानाने आणि कठोर सेन्सॉरशिपखाली बनवलेल्या या दोन चित्रपटांनी जे प्रश्न उपस्थित केले, ते प्रश्न स्वतंत्र भारतातही, एकविसाव्या शतकातही उत्तराच्या प्रतीक्षेत आहेत.

संदर्भसूचीः

1. पटेल, बाबुराव. आदमी ऑर लाइफ्स फॉर लिव्हिंग. सिनेमाझी. ९ सप्टेंबर १९३९. https://cinemaazi.com/feature/admi-or-life-s-for-living

2. बाली, करण. (२०१४). माणूस. अपरस्टॉल. https://upperstall.com/film/manoos/

3. बाली, करण. (२०१४). फ्लॅशबॅकः द स्टोरी ऑफ हाऊ प्रभात स्टुडिओज मेड द बिगेस्ट हिट्स इन इंडियन सिनेमा. (२०१४). स्क्रोल. https://scroll.in/article/679099

4. मतकरी, गणेश. (२०२२). चित्रपट प्रवाहांचा इतिहास जागतिक आणि भारतीय. महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक महामंडळ.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,२५ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६

संपादकीय

विदेशी निधीचा खेळ



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विदेशी अंशदान (नियमन) सुधारणा विधेयक, २०२६ पुन्हा एकदा मांडण्याची तयारी केली आणि देशभरातील चर्च, स्वयंसेवी संस्था, विरोधी पक्ष आणि आंतरराष्ट्रीय निरीक्षक यांच्यात एकच खळबळ उडाली. केरळ विधानसभेने या विधेयकाविरोधात ठराव मंजूर केला, कॅथोलिक बिशप्स कॉन्फरन्स ऑफ इंडियाने गृहमंत्र्यांची भेट घेतली, संयुक्त राष्ट्रांच्या तीन विशेष प्रतिनिधींनी चिंता व्यक्त केली आणि एका अमेरिकी काँग्रेस सदस्यानेही यावर भाष्य केले. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे भारताचे अंतर्गत विधिविषयक प्रकरण असल्याचे स्पष्टपणे बजावले. या साऱ्या गदारोळाच्या मुळाशी जो कायदा आहे, त्याचा प्रवास समजून घेतल्याशिवाय आजचा वाद नीट कळणार नाही. एफसीआरएचा जन्मच मुळी संशयास्पद वातावरणात झाला. इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीच्या काळात, ३१ मार्च १९७६ रोजी हा कायदा अस्तित्वात आला. त्यावेळचे उद्दिष्ट होते, विदेशी शक्तींचा भारताच्या अंतर्गत राजकारणावर, निवडणुकांवर आणि सामाजिक चळवळींवर प्रभाव पडू नये यासाठी विदेशी निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे. गंमत अशी की, हा कायदा आणला काँग्रेसने आणि आज त्याच कायद्याच्या कठोर आवृत्तीवरून भाजपला आणीबाणीच्या मानसिकतेचा आरोप सहन करावा लागतो आहे. १९८४ साली या कायद्यात सुधारणा करून परदेशी निधी स्वीकारणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवी संस्थेला गृह मंत्रालयाकडे नोंदणी सक्तीची करण्यात आली. पुढे २०१० साली, पुन्हा एकदा काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात, जुना कायदा रद्द करून नवा आणि अधिक कडक एफसीआरए, २०१० अस्तित्वात आला, जो २०११ पासून लागू झाला.

विदेशी निधीचा दुरुपयोग?

विदेशी निधीचा दुरुपयोग खरोखर होत होता का आणि तो कसा होत होता. स्वातंत्र्योत्तर काळात मध्य प्रदेश सरकारने १९५४ साली न्यायमूर्ती भवानी शंकर निगम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती, जिचा अहवाल १९५६ साली आला. या निगम समितीने आदिवासी भागांतील धर्मांतर आणि परदेशी मिशनरी निधी यांच्यातील संबंधांवर तपशीलवार भाष्य केले होते आणि शिक्षण, आरोग्यसेवा यांच्या नावाखाली आर्थिक प्रलोभने देऊन धर्मांतर घडवले जात असल्याचा ठपका ठेवला होता. पुढील दशकांत ओदिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, झारखंड यांसारख्या आदिवासीबहुल राज्यांनी स्वतंत्र धर्म स्वातंत्र्य कायदे (फ्रीडम ऑफ रिलिजन ॲक्ट्स) आणले, जे बळजबरी किंवा प्रलोभनाने केल्या जाणाऱ्या धर्मांतरावर नियंत्रण ठेवण्यासाठी होते. १९९८ सालचे गुजरातमधील डांग जिल्ह्यातील ख्रिसमसच्या काळातील हिंसाचार आणि जानेवारी १९९९ मध्ये ओदिशातील मनोहरपूर येथे ऑस्ट्रेलियन मिशनरी ग्रॅहम स्टेन्स आणि त्यांच्या दोन मुलांची जिवंत जाळून करण्यात आलेली हत्या, या दोन्ही घटनांनी धर्मांतर आणि विदेशी निधी हा विषय राष्ट्रीय पातळीवर पुन्हा तापवला. १९७६ पासून आजतागायत तब्बल वीस हजारांहून अधिक संस्थांचे एफसीआरए परवाने रद्द करण्यात आले आहेत, ज्यात ॲम्नेस्टी इंटरनॅशनल आणि ऑक्सफॅम इंडियासारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संस्थांचाही समावेश आहे, हे सरकारच्या दाव्याला बळ देणारे आकडे आहेत.

नवीन विधेयकात नेमकं काय?

२०२६ सालचे सुधारणा विधेयक हे या साऱ्या पार्श्वभूमीवरचे सर्वात आक्रमक पाऊल मानले जाते. या विधेयकाचा गाभा आहे कलम १५ रद्द करून त्याजागी नवे प्रकरण तीन-अ समाविष्ट करणे, ज्याद्वारे केंद्र सरकार नियुक्त करणार असलेल्या एका नियुक्त प्राधिकरणाला (डेझिग्नेटेड ऑथॉरिटी) एफसीआरए परवाना रद्द झालेल्या किंवा नूतनीकरण न झालेल्या संस्थांची मालमत्ता ताब्यात घेण्याचे, तिचे व्यवस्थापन करण्याचे आणि विक्री करण्याचे व्यापक अधिकार दिले जाणार आहेत. शिवाय कलम ३५ मध्ये बदल करून जास्तीत जास्त पाच वर्षांची शिक्षा घटवून एक वर्षावर आणली जाणार आहे आणि कलम ४३ अन्वये राज्य यंत्रणांना एफसीआरएप्रकरणी तपास सुरू करण्यापूर्वी केंद्र सरकारची पूर्वपरवानगी बंधनकारक केली जाणार आहे, ज्यामुळे तपासाचे केंद्रीकरण अधिक घट्ट होईल.

२२ जून २०२६ रोजी गृह मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या नव्या नियमांत धर्मप्रसार (प्रोसेलिटायझेशन) हा शब्द वगळून सरकारचे अधिकार केवळ विदेशी निधीतून निर्माण झालेल्या मालमत्तेपुरते मर्यादित ठेवल्याचे स्पष्ट करण्यात आले, तरीही प्रार्थनास्थळांचे धार्मिक स्वरूप जपले जाईल असे आश्वासन विधेयकात नमूद असूनही ख्रिश्चन समुदायाची अस्वस्थता कमी झालेली नाही. ६ ऑगस्ट २०२६ रोजी ख्रिश्चन प्रतिनिधी मंडळाने गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन विधेयक मागे घेण्याची किंवा संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची मागणी केली; शहा यांनी चिंता ऐकून घेतल्याचे व त्यावर विचार करण्याचे आश्वासन दिले.

विरोधकांचे म्हणणे काय?

विरोधी पक्षांची भूमिका मात्र स्पष्टपणे विधेयकाबाबत संशयाची आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी हे विधेयक सध्याच्या स्वरूपात संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावे आणि प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक नेमावे, अशी मागणी मुंबईत पत्रकार परिषदेत केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सीमांकनाच्या मुद्द्यावरून आधीच सरकारला घेरले असताना, हे विधेयक संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील दुसरे मोठे संघर्षक्षेत्र बनले आहे. एका अमेरिकी काँग्रेस सदस्याने भारत-अमेरिका संबंधांवर याचा परिणाम होऊ शकतो असा इशारा दिला. यावर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ठाम भूमिका घेत सांगितले की भारताच्या विधिविषयक बाबींवर निर्णय घेण्याचा अधिकार केवळ भारताच्या संसदेला आहे आणि अमेरिकेसह अनेक देशांतही विदेशी निधीचे नियमन करणारे स्वतःचे कायदे अस्तित्वात आहेत.

विदेशातील कायदे काय?

अमेरिकेचा फॉरेन एजंट्स रजिस्ट्रेशन ॲक्ट म्हणजे फारा हा १९३८ सालचा कायदा, नाझी प्रचारतंत्राला रोखण्यासाठी आणला गेला होता आणि आजही परदेशी सरकारांसाठी किंवा संस्थांसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना नोंदणी सक्तीची करतो; या कायद्याचे उल्लंघन केल्यास फौजदारी कारवाईचीही तरतूद आहे. रशियाने २०१२ पासून ह्याविदेशी एजंटह्ण कायदा वापरून हजारो स्वयंसेवी संस्था व माध्यम संस्थांची गळचेपी केली आहे, तर ऑस्ट्रेलियानेही २०१८ साली विदेशी प्रभाव पारदर्शकता कायदा लागू केला. भारत सरकारचा युक्तिवाद हाच आहे की, प्रत्येक सार्वभौम राष्ट्राला विदेशी निधीचे नियमन करण्याचा अधिकार आहे. आजची वस्तुस्थिती अशी आहे की, विदेशी निधीच्या गैरवापराच्या ऐतिहासिक तक्रारींना पूर्णतः नाकारता येत नाही आणि त्याचबरोबर या नव्या विधेयकाद्वारे सरकारला मिळणारे ह्यनियुक्त प्राधिकरणाह्णचे अनियंत्रित अधिकार, न्यायालयीन पुनरावलोकनाची मर्यादित तरतूद आणि राज्य यंत्रणांच्या स्वायत्ततेवर घातलेली बंधने, हे लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक आहेत. शिक्षण, आरोग्यसेवा, अनाथाश्रम यांसारख्या क्षेत्रांत दशकानुदशके काम करणाऱ्या ख्रिश्चन संस्थांना राष्ट्रविरोधी कारवायांच्या संशयातून मोजण्याची प्रवृत्ती जितकी अन्यायकारक आहे, तितकीच विदेशी निधीच्या नावाखाली होणाऱ्या संघटित धर्मांतर मोहिमांकडे कानाडोळा करणेही अवास्तव आहे. आता संयुक्त संसदीय समितीकडे विधेयक पाठवण्याची मागणी सरकारने मान्य केली.


मधुमेह व्यवस्थापनात योगसाधनेचे महत्त्व



आज भारताला जगाची मधुमेह राजधानी असे संबोधले जाते. बदललेली जीवनशैली, बैठी कामे, अपुरा व्यायाम, अनियमित आहार, वाढलेला ताणतणाव आणि झोपेच्या समस्या यांमुळे मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. मधुमेह हा केवळ रक्तातील साखर वाढण्याचा आजार नसून तो हृदय, मूत्रपिंड, डोळे, मज्जासंस्था आणि रक्तवाहिन्यांवरही परिणाम करणारा दीर्घकालीन विकार आहे. त्यामुळे औषधोपचारांबरोबरच जीवनशैलीत सकारात्मक बदल करणे अत्यावश्यक ठरते. येथेच योगसाधनेचे महत्त्व अधोरेखित होते.योग हा शरीर, मन आणि श्वास यांचा समन्वय साधणारा विज्ञानाधारित मार्ग. नियमित योगाभ्यासामुळे शरीरातील विविध ग्रंथी, स्नायू आणि अवयव अधिक कार्यक्षम बनतात. मधुमेहाच्या संदर्भात योगसाधनेचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम म्हणजे ताणतणाव कमी करणे आणि अंतःस्रावी प्रणालीचे संतुलन राखणे. ताण वाढल्यास शरीरात कॉर्टिसोल आणि एड्रेनालिन यांसारख्या संप्रेरकांचे प्रमाण वाढते. ही संप्रेरके रक्तातील साखरेची पातळी वाढवू शकतात. योग, प्राणायाम आणि ध्यानामुळे ताण नियंत्रणात राहतो आणि रक्तातील साखरेचे व्यवस्थापन अधिक चांगल्या प्रकारे होण्यास मदत होते. संशोधनातून असे दिसून आले आहे की, नियमित योगाभ्यासामुळे शरीरातील पेशींची इन्सुलिनप्रति संवेदनशीलता सुधारू शकते. परिणामी, शरीर इन्सुलिनचा अधिक प्रभावी वापर करू शकते. काही योगासने स्वादुपिंडाच्या (ढंल्लू१ी२) कार्यक्षमतेस चालना देतात, असे मानले जाते. स्वादुपिंड हा इन्सुलिन तयार करणारा महत्त्वाचा अवयव असल्याने त्याचे आरोग्य टिकवणे आवश्यक असते. मधुमेह असलेल्या व्यक्तींनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काही विशिष्ट आसनांचा समावेश आपल्या दिनचर्येत करावा. मंडूकासन, अर्धमत्स्येंद्रासन, भुजंगासन, धनुरासन, पश्चिमोत्तानासन, पवनमुक्तासन आणि वज्रासन ही आसने मधुमेह व्यवस्थापनासाठी उपयुक्त मानली जातात. या आसनांमुळे पोटातील अवयवांवर सौम्य दाब पडतो, रक्ताभिसरण सुधारते आणि शरीर अधिक सक्रिय बनते. अर्थात, प्रत्येक व्यक्तीची शारीरिक क्षमता वेगळी असल्याने कोणतेही आसन तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करणे योग्य ठरते. प्राणायाम हा योगसाधनेचा अत्यंत महत्त्वाचा भाग. अनुलोम-विलोम, भ्रामरी, नाडीशोधन आणि दीर्घ श्वसन यांसारख्या प्राणायाम प्रकारांमुळे मज्जासंस्थेचे संतुलन राखण्यास मदत होते. नियमित प्राणायामामुळे मानसिक शांतता मिळते, चिंता कमी होते आणि शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा सुधारतो. मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये आढळणारा मानसिक ताण कमी करण्यासाठी प्राणायाम अत्यंत उपयुक्त ठरतो. ध्यान किंवा मेडिटेशनचे महत्त्वही तितकेच आहे. अनेकदा मधुमेहाचे निदान झाल्यानंतर व्यक्तीमध्ये भीती, चिंता किंवा नैराश्य निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीत ध्यान मनाला स्थिरता देते. नियमित ध्यानामुळे मनातील नकारात्मक विचार कमी होतात, सकारात्मकता वाढते आणि आरोग्याबाबत सजगता निर्माण होते. मानसिक आरोग्य सुधारल्याने व्यक्ती औषधे, आहार आणि व्यायाम यांचे पालन अधिक शिस्तबद्धपणे करू शकते. योगसाधनेमुळे केवळ रक्तातील साखरेवरच नव्हे, तर मधुमेहाशी संबंधित इतर जखमांवरही सकारात्मक परिणाम होतो. नियमित योगाभ्यासामुळे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. लठ्ठपणा हा टाईप-2 मधुमेहाचा प्रमुख जोखीम घटक मानला जातो. योगामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत होते, तसेच स्नायूंची ताकद आणि लवचीकता वाढते. त्याचबरोबर रक्तदाब, कोलेस्टेरॉल आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठीही योग साहाय्यक ठरतो. तथापि, एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात ठेवली पाहिजे की, योगसाधना हा मधुमेहावरील जादुई उपचार नाही. योगामुळे मधुमेह पूर्णपणे बरा होतो असे म्हणणे वैज्ञानिकदृष्ट्या योग्य नाही. मात्र, योग्य आहार, नियमित व्यायाम, वैद्यकीय उपचार आणि सकारात्मक जीवनशैली यांच्यासोबत योगाचा समावेश केल्यास मधुमेहाचे प्रभावी व्यवस्थापन करता येते.

अनेक रुग्णांमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवणे, औषधांची गरज कमी होणे, वजन नियंत्रण आणि जीवनमान सुधारणे यासाठी योगसाधना महत्त्वाची भूमिका बजावते. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आपण योगाकडे केवळ एक दिवसाचा उपक्रम म्हणून न पाहता, जीवनशैलीचा अविभाज्य भाग म्हणून पाहिले पाहिजे. आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्य जपण्यासाठी योग हा अत्यंत सहज, सुरक्षित आणि किफायतशीर मार्ग आहे. दररोज केवळ 30 ते 45 मिनिटे योगसाधनेसाठी दिल्यास त्याचे दूरगामी सकारात्मक परिणाम अनुभवता येतात. मधुमेहासारख्या जीवनशैलीजन्य आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी औषधांइतकीच जीवनशैलीची शिस्त महत्त्वाची आहे. योगसाधना ही शिस्त निर्माण करते, मन आणि शरीर यांचा समतोल साधते आणि व्यक्तीला आरोग्यदायी जीवनाकडे नेते. त्यामुळे यंदाच्या योग दिनानिमित्त प्रत्येकाने एक संकल्प करूया- योगसाधनेला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवूया आणि निरोगी, सक्रिय व आनंदी जीवन जगूया! योगसाधना ही केवळ आसनांचे प्रदर्शन नाही, योगसाधना ही सजगतेचा, संतुलनाचा आणि आरोग्यपूर्ण जीवनाचा मार्ग आहे. मधुमेहासारख्या वाढत्या आव्हानासमोर योग आपल्याला आशेचा किरण दाखवतो. म्हणूनच, आजच्या काळात योग ही केवळ गरज नाही, तर आरोग्यदायी भविष्यासाठीची एक प्रभावी गुंतवणूक आहे. योग करा, ताण कमी करा, मधुमेहावर नियंत्रण मिळवा आणि आरोग्यपूर्ण जीवनाचा आनंद घ्या!

बदलत्या भू-राजकीय पटावरील नवा 'ग्रेट गेम'



सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्की या तीन देशांनी केलेला मक्का संयुक्त संरक्षण करार केवळ लष्करी नाही. जागतिक सत्ता समीकरणांमध्ये होत असलेल्या एका मोठ्या पुनर्रचनेची ती नांदी आहे. सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्की या तीन देशांनी केलेला मक्का संयुक्त संरक्षण करार केवळ लष्करी नाही. जागतिक सत्ता समीकरणांमध्ये होत असलेल्या एका मोठ्या पुनर्रचनेची ती नांदी आहे.

गेल्या काही दिवसांत पश्चिम आशिया आणि दक्षिण आशियाई प्रदेशातील भू-राजकीय वातावरणात वेगाने हालचाली होत आहेत. मक्का संयुक्त संरक्षण कराराच्या निमित्ताने एकीकडे नवीन सुरक्षा चौकटी आकाराला येत आहेत, तर दुसरीकडे हूती बंडखोरांच्या हल्ल्यांसारख्या घटनांमधून या प्रदेशातील अस्थिरतेची दाहकताही प्रकर्षाने जाणवत आहे.

मक्का करार हा या तिन्ही देशांच्या दृष्टीने एक धाडसी पाऊल आहे. करारातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे सामूहिक संरक्षण . या तरतुदीनुसार, या तीनपैकी कोणत्याही एका देशावर झालेला सशस्त्र हल्ला हा तिन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल. नाटोच्या प्रसिद्ध कलम ५ शी साधर्म्य दर्शवणारी ही तरतूद, या कराराची व्याप्ती आणि गांभीर्य स्पष्ट करते.

या युतीचे स्वरूप समजून घेताना तिन्ही देशांचे आपापले अजेंडे लक्षात घेणे गरजेचे आहे. सौदी अरेबिया, जो पारंपरिकपणे अमेरिकेच्या सुरक्षा छत्राखाली होता, तो आता आपली रणनीतिक स्वायत्तता वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. अमेरिकेच्या मध्यपूर्वेच्या भूमिकेतील अनिश्चितता आणि इराणचा वाढता प्रभाव पाहता, सौदीला एका विश्वासार्ह प्रादेशिक भागीदाराची गरज होती. तुर्कीसाठी ही युती इस्लामिक जगातील नेतृत्वासाठी होणाऱ्या चढाओढीत आपले स्थान अधिक बळकट करण्याची संधी आहे, तर पाकिस्तानसाठी हा करार त्यांच्या ढासळत्या अर्थव्यवस्थेला आणि लष्करी प्रतिष्ठेला सावरण्यासाठी एक लाईफलाईन ठरू शकतो.

पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि तुर्की यांची ही युती केवळ संरक्षणापुरती मर्यादित राहिलेली नाही. यात तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त लष्करी सराव आणि गुप्तचर माहितीची देवाणघेवाण यांचा अंतर्भाव आहे. विशेषतः तुर्कीचे प्रगत ड्रोन तंत्रज्ञान आणि पाकिस्तानची अण्वस्त्र सज्ज लष्करी ताकद यांचा मेळ घातल्यास, ही युती पश्चिम आशियातील एक प्रभावी लष्करी शक्ती बनू शकते.

मात्र, हे सर्व चित्र जितके बाहेरून सुसंगत दिसते, तितकेच ते अंतर्गत विरोधाभासांनी भरलेले आहे. पाकिस्तानचे इराणशी असलेले संबंध, तुर्कीची नाटोमधील भूमिका आणि सौदी अरेबियाची जागतिक अर्थव्यवस्थेतील गुंतागुंतीची स्थिती, यांमुळे या कराराची अंमलबजावणी करणे हे एक मोठे आव्हान असेल. या तिन्ही देशांचे हितसंबंध नेहमीच एका रेषेत असतील, असे मानणे कठीण आहे.

एकीकडे हे देश लष्करी कराराच्या माध्यमातून सुरक्षा वाढवण्याचे स्वप्न पाहत असताना, दुसरीकडे वास्तवातील हिंसाचार वेगळीच गोष्ट सांगत आहे. नुकताच नजराण प्रांतात झालेला हूती बंडखोरांचा हल्ला हे याचे उत्तम उदाहरण आहे. सौदी अरेबियाच्या सीमेवर झालेल्या या हल्ल्यात ११ नागरिक जखमी झाले, ज्यात लहान मुलांचाही समावेश होता. सौदी लष्कराचे प्रवक्ते तुर्की अल-माल्की यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध करत याला आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे उल्लंघन म्हटले आहे.

हे हल्ले हे केवळ स्थानिक संघर्ष नसून, ते या प्रदेशात किती खोलवर अस्थिरता आहे, याचे निदर्शक आहेत. येमेनमध्ये एप्रिल २०२२ मध्ये संघर्षविराम करार होऊनही, तिथे शांतता प्रस्थापित होण्याऐवजी संघषार्ची नवी लाट येत असल्याचे दिसत आहे. हूती बंडखोरांच्या या वाढत्या आक्रमकतेमुळे सौदी अरेबियाच्या दक्षिण सीमा सातत्याने तणावाखाली आहेत. मक्का करार अशा वेळी झाला आहे, जेव्हा प्रादेशिक सुरक्षेची गरज सर्वोच्च स्तरावर आहे, परंतु त्याच वेळी अशा हल्ल्यांमुळे या कराराच्या प्रभावीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

भारतासाठी ही संपूर्ण घडामोड एका सतर्कतेच्या इशाऱ्या सारखी आहे. भारताचे सौदी अरेबियाशी व्यापारी आणि धोरणात्मक संबंध अत्यंत दृढ आहेत, परंतु पाकिस्तान आणि तुर्कीची भारताबाबतची धोरणे नेहमीच प्रतिकूल राहिली आहेत. जेव्हा सौदी अरेबिया भारताचा मित्र असताना पाकिस्तान आणि तुर्कीशी अशी घनिष्ट लष्करी युती करतो, तेव्हा भारताला आपल्या पश्चिम आशियाई धोरणाचे पुनर्रावलोकन करावे लागते.

या त्रिपक्षीय आघाडीमुळे प्रादेशिक सत्तासंतुलन बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः तुर्कीने ज्या प्रकारे काश्मीरसह अनेक मुद्द्यांवर भारताच्या विरोधात भूमिका घेतली आहे, ते पाहता या युतीतील तुर्कीचा सहभाग भारतासाठी चिंतेचा विषय ठरतो. सौदी अरेबिया एकाच वेळी भारताशी आणि या त्रिपक्षीय गटाशी संबंध कशा प्रकारे हाताळतो, हे त्यांच्या मुत्सद्देगिरीचे मोठे आव्हान आहे. भारताला आता पश्चिम आशियात केवळ जुन्या संबंधांवर अवलंबून न राहता, नवीन धोरणात्मक पूल बांधावे लागतील. आपल्या सुरक्षेचे हित जपण्यासाठी भारताला अधिक सक्रिय आणि प्रखर मुत्सद्देगिरीची गरज आहे.

थोडक्यात सांगायचे तर, मक्का करार आणि हूती हल्ले या दोन भिन्न घटना असूनही, त्या एकाच व्यापक चित्राचे भाग आहेत. हा प्रदेश आता बाह्य शक्तींवर (विशेषतः अमेरिका आणि पाश्चात्य जगावर) अवलंबून न राहता, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी प्रादेशिक आघाड्यांकडे वळत आहे. देश आता आपल्या सोयीनुसार नवीन गटांची निर्मिती करत आहेत, जे जागतिक व्यवस्थेच्या बदलत्या रूपाचे लक्षण आहे.

ही युती प्रादेशिक शांततेसाठी सकारात्मक ठरेल की संघषार्ला अधिक तीव्र करेल, हे येणारा काळच ठरवेल. मात्र, एक गोष्ट स्पष्ट आहे की, पश्चिम आशियातील हा बदलता हिंसाचार आणि नवनवीन लष्करी करार, हे भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी अत्यंत कठीण परीक्षा पाहणारे आहेत. भारताने या बदलत्या वास्तवाचा खोलवर अभ्यास करून, आपल्या धोरणांमध्ये लवचिकता आणणे ही काळाची गरज आहे. ही केवळ एक संरक्षण आघाडी नसून, भविष्यातील जागतिक सत्ता समीकरणांची एक नांदी आहे. या स्थित्यंतराकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, कारण या प्रदेशातील प्रत्येक हालचालीचा थेट परिणाम जागतिक शांततेवर आणि भारताच्या आर्थिक-धोरणात्मक हितांवर होणार आहे.

ऑपरेशन सिंदूर वेळी तुर्की आणि चीनने थेट पाकिस्तानला मदत केली. म्हणजेच भारताच्या ते विरोधात राहिले. आता या करारात चीन नसला तरी आगामी काळात हे त्रिकुट आणि चीन या सर्वांचाच विचार भारताला करणे क्रमप्राप्त आहे. शत्रूचा शत्रू आपला मित्र या न्यायाने चांडाळ चौकडी उभी राहणे आणि त्याद्वारे धोका निर्माण होणे घातक आहे. यापुढे भारताला अधिक सजग रहावे लागेल आणि दूरदृष्टीने पावले टाकावी लागतील. जेणेकरून आपल्या देशाचे रक्षण करतानाच आगामी काळातील धोकाही संपुष्टात आणता येईल.

शेवटी, सौदी-पाकिस्तान-तुर्की यांचे हे त्रिकूट किती काळ टिकेल आणि ते आपल्या उद्दिष्टांमध्ये किती यशस्वी होईल, यावर अनेक प्रश्नचिन्हे आहेत. परंतु, या कराराने हे सिद्ध केले आहे की, पश्चिम आशिया आता बदलला आहे आणि या बदलत्या जगात आपले स्थान सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला आपल्या चाली पुन्हा एकदा विचारपूर्वक आखणे भाग पडणार आहे.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२५ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६

श्रावणी सोमवारी मोठी दुर्घटना !

अशोकधाम मंदिरात चेंगराचेंगरी... ७ भाविकांचा मृत्यू, अनेक जखमी



बिहार, श्रावण महिन्यात भगवान शंकराच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक मंदिरांमध्ये गर्दी करत आहेत. अशातच बिहारमधील लखीसराय जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अशोकधाम मंदिराबाहेर सोमवारी (दि. १७) पहाटे भाविकांची मोठी गर्दी झाल्यानंतर चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत सात ते आठ महिलांचा मृत्यू झाला असून अनेक भाविक जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अचानक गोंधळ, बॅरिकेडिंग कोसळलं अन् चेंगराचेंगरी प्राथमिक माहितीनुसार, अशोकधाम रेल्वे स्थानकाकडून मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी होती. सकाळी गर्दी वाढत असतानाच मार्गावर वीजेचा खांब पडला. काही भाविकांना विजेचा धक्का (शॉक) लागल्याची माहिती पसरल्याने अचानक घबराट निर्माण झाली. जीव वाचवण्यासाठी भाविकांची धावपळ सुरू झाली. याच गोंधळात बॅरिकेडिंग कोसळल्याने अनेक जण खाली पडले आणि त्यानंतर चेंगराचेंगरी झाली. दरम्यान, काही माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, जिल्हा प्रशासनाने नंतर या घटनेबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

जिल्हाधिकारी शैलेंद्र कुमार आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी नीरज कुमार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, भाविकांचा मृत्यू विजेचा शॉक लागल्यामुळे झालेला नसून चेंगराचेंगरीत चिरडल्याने झाला. घटनेच्या वेळी परिसरातील वीजपुरवठा बंद होता आणि विजेच्या तारा झाकलेल्या असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दोन ट्रेन एकाच वेळी आल्याने वाढला गोंधळ? प्रशासनाच्या प्राथमिक तपासानुसार, सोमवारी सकाळी अशोकधाम हॉल्टवर दोन्ही दिशांनी एकाच वेळी दोन ट्रेन आल्या. ट्रेन पाहताच काही तरुण अचानक धावू लागले. त्यामुळे आधीच मोठी गर्दी असलेल्या परिसरात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. याचदरम्यान एक वीजेचा खांब कोसळला. खांब पडल्याने काही जणांना विजेचा धक्का लागल्याची अफवा गर्दीत वेगाने पसरली. अफवेमुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि अनेकांनी सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी धाव घेतली. अचानक वाढलेल्या गर्दीच्या दबावामुळे बॅरिकेडिंग कोसळले. अनेक भाविक खाली पडले आणि त्यांच्यावर गदीर्तील इतर लोक पडल्याने चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत आठ महिला भाविकांचा मृत्यू झाला असून नऊ जण जखमी झाले आहेत.

पश्चिम बंगालमध्ये मोठी दुर्घटना ! ७ जणांचा करुण अंत

गाढ झोपेत असतानाच हॉटेलला भीषण आग



बंगाल। पश्चिम बंगालच्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्र तारापीठमध्ये सोमवारी (दि. १७) पहाटे मोठी दुर्घटना घडली. येथील एका चार मजली हॉटेलला अचानक आग लागल्याने किमान ७ जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. आगीच्या वेळी हॉटेलमधील बहुतांश लोक झोपेत असल्याने बचावासाठी मोठी धावपळ उडाली. पहाटे ५ वाजता हॉटेलमध्ये आग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटे सुमारे ४:३० ते ५ वाजण्याच्या सुमारास चार मजली हॉटेलच्या तळमजल्यावर अचानक आग लागली. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात धूर पसरला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. हॉटेलमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे बचावकार्यही करण्यात आले. जखमींवर रुग्णालयात उपचार आगीत जखमी झालेल्यांना उपचारासाठी रामपूरहाट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. सुरुवातीला या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, त्यानंतर पोलिसांनी मृतांचा आकडा ७ वर पोहोचल्याचे स्पष्ट केले.

शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा दावा हॉटेल प्रशासनाने प्राथमिक माहितीनुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा दावा केला आहे. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, हॉटेलमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचीही पाहणी केली जात आहे. 'हॉटेलमध्ये सर्वत्र धूर पसरला' या आगीतून बचावलेल्या कोलकात्यातील एका महिलेने हॉटेलमधील भयावह परिस्थिती सांगितली. "अचानक संपूर्ण हॉटेलमध्ये धूर पसरला. श्वास घेणंही कठीण झालं होतं आणि बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधणं अवघड झालं," असे तिने सांगितले. दरम्यान, मृतांमध्ये तारापीठमधील प्रसिद्ध काली मंदिरात दर्शनासाठी आलेल्या काही भाविकांचाही समावेश असल्याची

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभाग आरपीएफची 'ऑपरेशन नारकोस'अंतर्गत मोठी कारवाई

१० लाखांचा गांजा जप्त



दिल्ली। मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील रेल्वे सुरक्षा दलाने "ऑपरेशन नारकोस" अंतर्गत भुसावळ रेल्वे स्थानकावर अंमली पदार्थांच्या तस्करीविरुद्ध धडक कारवाई करत ९ लाख ९७हजार ९५० रुपये किमतीचा १९.९५९ किलो गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. १६ ऑगस्ट २०२६ रोजी ट्रेन क्रमांक १२८६० गीतांजली एक्सप्रेस भुसावळ स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर आली असता, ड्युटीवर तैनात सुरक्षा आरक्षक लोकेश्वर यादव यांना पुढील बाजूकडील दुसऱ्या डब्यातून एक संशयित व्यक्ती खांद्यावर पांढऱ्या प्लास्टिकची गोणी घेऊन उतरताना दिसली.

संशय आल्याने त्याची चौकशी केली असता गोणीमध्ये गांजा असल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी संशयितासह ती गोणी आरपीएफ पोस्टवर आणून सहायक सुरक्षा निरीक्षक महिलाल सिंह यांना माहिती दिली. त्यानंतर मंडळ सुरक्षा नियंत्रक, वरिष्ठ अधिकारी, जीआरपी व सीआयबी भुसावळ यांना घटनेची कल्पना देण्यात आली. आरपीएफच्या "वीरू" या शोधक श्वानाने तपासणी केली असता गोणीत अंमली पदार्थ असल्याची पुष्टी झाली.

१० लाखांचा गांजा जप्त

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने आणि नियमानुसार आवश्यक कार्यवाही पूर्ण करून गोणीची झडती घेतली असता, त्यात गांजाची १० बंडले आढळली. ही कारवाई कॉन्स्टेबल कपिल कुमार (सीआयबी), जीआरपी कर्मचारी आणि सहाय्यक सुरक्षा आयुक्त जितेंद्र सिंहा यांच्या उपस्थितीत करण्यात आली. जप्त केलेल्या १९.९५९ किलो गांजाची अंदाजे किंमत ९,९७,९५० रुपये आहे. याप्रकरणी अरुण कुमार उर्फ सोनू लालू प्रसाद (वय २५, रा. चरतीपूर, पोस्ट बारा, जि. कानपूर, उत्तर प्रदेश) या आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपी व जप्त गांजा जीआरपी भुसावळ यांच्या ताब्यात देण्यात आला असून, १७ ऑगस्ट २०२६ रोजी एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मध्य रेल्वेचा भुसावळ विभाग अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी कटिबद्ध असून, प्रवाशांनी कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित आरपीएफ किंवा जीआरपीशी संपर्क साधावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

वाहन हस्तांतरण व ना हरकत प्रमाणपत्रासाठी आधार प्रमाणीकरणाची सुधारित प्रक्रिया



मुंबई : वाहनाच्या मालकी हक्क हस्तांतरणासाठी तसेच ना हरकत प्रमाणपत्रासाठी देशभरात एकसमान व प्रमाणित ऑनलाइन कार्यप्रवाह लागू करण्यात आला आहे. या सेवांसाठी संबंधित अर्जदाराचे आधार प्रमाणीकरण अनिवार्य प्रक्रियेचा भाग करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये ऑनलाईन परिवहन सेवांची एकसमान व प्रमाणित पद्धतीने अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मालकी हक्क हस्तांतरण व ना हरकत प्रमाणपत्र सेवांसाठी सुधारित कार्यप्रवाह निश्चित करण्यात आला आहे. या कार्यप्रवाहास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाली असून, त्यानुसार सेवांचा निपटारा करण्यात येत आहे. वाहन नोंदणी प्रमाणपत्रावरील (आरसी) नाव आणि आधार कार्डवरील नाव यामध्ये तफावत आढळल्यास वाहन प्रणालीमध्ये "Please visit aadhar center to update the pin code or visit RTO/apply using mobile authentication, to avail contactless services. Name is not matching in vahan and aadhar." असा संदेश दिसतो. त्यामुळे वाहन मालकांनी आपल्या आधार कार्डवरील नाव वाहन नोंदणी प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे दुरुस्त करून घेणे आवश्यक आहे. नावातील तफावत दूर झाल्यानंतर वाहन-४.० प्रणालीमध्ये आवश्यक दुरुस्ती करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी. त्यानंतरच वाहन मालकी हक्क हस्तांतरण किंवा ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. वाहन प्रणालीतील हे बदल संपूर्ण देशभर लागू करण्यात आले आहेत. वाहनविषयक विविध ऑनलाईन सेवांचा सुरळीतपणे व संपर्करहित पद्धतीने लाभ घेण्यासाठी वाहन मालकांनी आधार कार्डवरील नाव, पत्ता आणि मोबाईल क्रमांक अद्ययावत करून घेण्याचे सह परिवहन आयुक्त (आय.टी.) शैलेश कामत यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./११४९//२६-२७

दिनांक :- २१/०८/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	गास-०५	GS०५/३१५९/३८	३५७४९	लक्ष्मी इंटरप्रायजेस	मोहम्मद नूर आलम
२	गास-०५	GS०५/१२४८	३५७५३	मुबारक खान	मोहम्मद झुबेर/शहजादी खातून मो. झूबेर शेख
३	गास-०५	GS०५/३१७६/२	३९४५५	तहिरा हमीद शेख	हिना निसार खान/रिहाना हसन शेख
४	गास-०५	GS०५/३२१२/५५	३९४४३	मोह. इमरान रेहान शेख	शेख नाजमा नजीर
५	गास-०५	GS०५/३१६४/७	३९४५२	अहमद अब्दुल्ला कोवल वल्लफ्फ	मोहम्मद तोसीफ मोहम्मद युनुस अन्सारी
६	गास-०५	GS०५/३१६४/८	३९४३८	अहमद अब्दुल्ला कोवल वल्लफ्फ	अनास सामी अहमद डांगे
७	गास-०५	GS०५/९५०	३७२३९	लिओनार्ड अंद्रया फोस	आल्बर्ट विक्टर अल्फान्सो
८	गास-०५	GS०५/३२३६/१४	३६१७८	शेख समीउल्ला रहेमतुल्ला	जिब्रन आरिफ डाबरे
९	गास-०५	GS०५/३१७८/१३	३९४५९	सुनिल कुमार पटेल	अशरफ रजा मोहम्मद आरिफ खान
१०	गास-०५	GS०५/३१७३/२६	३९४४९	राजाराम लालाराम पटेल	मोहम्मद आरिफ खान
११	गास-०४	GS०४/३६०/२८	२७७०४	ओम साई डेव्हलपर्स	उज्वला विष्णू खरात
१२	गास-०५	GS०५/३०२५/३५	२७७०१	माजिद हनिफ खान	जिनत जावेद सय्यद
१३	गास-०५	GS०५/३१८८/२९	२७६९९	राजाराम पटेल	खाबीर अली मोल्लिक
१४	गास-०५	GS०५/३१९४/१	३९५४१	वसिम असलम खान	समसाद फात्मा
१५	गास-०५	GS०५/३१८९/१८	३९१७४	देवराम सिरखी	अंजुम बेगम शकिल अहमद
१६	गास-०५	GS०५/३२२४/६०	३८५७१	दीपक मंडल	परवेज अब्दुल रहीम शेख
१७	गास-०५	GS०५/७८२	३९२१२	नजमा मुस्ताक खान	सद्दाम खान
१८	गास-०५	GS०५/३२३६/३०	३६१८७	शेख समीउल्ला रहेमतुल्ला	जुमेर अल्लाउदीन शेख
१९	गास-०३	GS०३/४२२/२	३९५०५	गाब्रियल जोसेफ डिमेलो	पंकज कमलेश कनोजिया

सही

(मेधा वर्तक)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com